# आधारकार्ड सोबत बाळगण्याचं टेन्शन मिटलं, नवं ॲप येणार

**नवी दिल्ली–** यूआयडीएआयकडून जारी करण्यात आलेलं आधार कार्ड आता महत्त्वाच्या कागदपत्रांपैकी एक आहे.आधार कार्डचा वापर करणं सोपं व्हावं आणि आधार कार्डचा वापर वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न करण्यात येत आहे. आधार कार्ड संदर्भात नवं फीचर लाँच करणयात आलं आहे. हे आधारच्या डिजिटलायझेशनं संदर्भातील महत्त्वाचं पाऊल आहे. केंद्रीय मंत्री माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या संदर्भातील माहिती दिली. फेस आयडी ऑथेटिकेशन फीचरसह यूआयडीएआयनं ॲप लाँच केलं आहे.

नव्यानं लाँच करण्यात येणाऱ्या आधारच्या ॲपसह एअरपोर्ट आणि हॉटेलमध्ये चेक न करताना आधार कार्डच्या सॉफ्ट कॉपी किंवा हार्ड कॉपी द्यावी लागणार नाही. यूआयडीएआयनं नवं ॲप विकसित केलं आहे. सध्या लाँच करणयात आलेलं ॲप बेटा स्वरुपाचं असून तपासणीच्या टप्प्यात आहे. याची चाचणी यशस्वी झाल्यास ते सर्वांसाठी लाँच कलं जाईल.

आधार कार्डची गरज पडल्यास क्यूआर कोड आणि फेस आयडीच्या द्वारे पडताळणी केली जाईल. या ॲपमुळं फेस आयडी ऑथेंटिकेशनला डिजिटल पडताळणीला प्रोत्साहन मिळेल. याच्या सुरक्षा आणि गोपनीयतेसाठी आर्टिफिशअल इंटेलिजन्सची मदत घेतली जात आहे. नव्या आधार कार्ड ॲपमध्ये गोपनीयतेला प्राधान्य दिलं जाणार आहे. यामुळं वैयक्तिक माहितीचं नियंत्रण यूजरच्या हातात असेल. डेटा शेअरिंगसाठी यूजर्सची मान्यता अपेक्षित असेल, त्यामुळं गोपनीयता कायम राहील. फेस आयडी ऑथेंटिकेशन मुळं आता फक्त चेहऱ्याच्या आधारे आधार पडताळणी केली जाईल. यामुळं यूपीआय पेमेंट प्रक्रिया सोपी होईल. यूआयडीएआयच्या दाव्यानुसार ॲप १०० टक्के डिजीटल आणि सुरक्षित असल्यानं यामध्ये डेटा सोबत छेडछा करता येणार नाही. यामुळं डेटा लीक होणार नाही, याचा दुरुपयोग होणार नाही. डिजिटल इंडिया कार्यक्रमानुसार हे ॲप पेपरलेस गव्हर्नंसला प्रोत्साह मिळेल. ज्यामुळं आधार कार्डशी संबंधित कामं डिजिटली पूर्ण होतील.

# दूध उत्पादकांचे अनुदान तातडीने जमा करा

## ...अन्यथा रस्त्यावर उतरु- आ. ओगले

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** दूध उत्पादकांचे थकलेले अनुदान तातडीने त्यांच्या खात्यावर जमा करा, अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा आमदार हेमंत ओगले यांनी दिला आहे.

अनेक संकटांना तोंड देऊन मोठ्या कसोटीने दूध उत्पादक हा आपला व्यवसाय करत आहे सरकारने जाहीर केलेले अनुदान अद्याप पर्यंत जमा केलेले नाही. एकीकडे मागील काही वर्षात दुधाच्या कमी दरांमुळे दूध उत्पादक अडचणीत होता आणि आता दुसरीकडे जमा न झालेले अनुदान अशा अनेक संकटांना दूध उत्पादक सध्या सामोरे जात आहे. शेतकऱ्यांचा मुख्य जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते जास्तीत जास्त उत्पादक हे शेतकरी बांधव आहे. एकीकडे न केलेली कर्जमाफी, पिकांना न दिलेला हमीभाव आणि आता दूध उत्पादकांचे देखील अनुदान सरकारने रोखल्याने दूध उत्पादकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी तातडीने दूध उत्पादकांचे थकलेले अनुदान त्यांच्या खात्यावर वर्ग करा अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशारा आमदार हेमंत ओगले यांनी दिला आहे. आमदार हेमंत ओगले यांनी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा तसेच दूध उत्पादकांना वाचविण्यासाठी जास्तीत जास्त अनुदान द्यावे अशी मागणी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये सरकारकडे केली होती.

# करुणा शर्मा आणि धनंजय मुंडे यांचे संबंध लग्नासारखेच, कोर्टाचं निरीक्षण

**मुंबई–** माझगाव सत्र न्यायालयाने नुकतंच माजी मंत्री धनंजय मुंडे यांची याचिका फेटाळत करुणा शर्मा यांना दिलासा दिला. या प्रकरणी माझगाव सत्र न्यायालयाने धनंजय मुंडे यांची याचिका फेटाळताना काय निरीक्षण नोंदवलं आहे? याची माहिती आता समोर आली आहे. करुणा शर्मा आणि धनंजय मुंडे यांचे संबंध हे लग्नासारखेच आहेत, असं निरीक्षण माझगाव सत्र न्यायालयाने नोंदवलं आहे. २ मुलांना जन्म दिला हे एकाच घरात राहिल्याशिवाय शक्य नाही, असंही न्यायालयाने म्हटलं आहे. त्यामुळे करुणा शर्मा यांच्यासाठी हा मोठा दिलासा आहे.

करुणा शर्मा यांना २ लाख रुपये पोटगी देण्याच्या वांद्रे कुटुंब न्यायालयाच्या निर्णयाला धनंजय मुंडे यांनी माझगाव सत्र न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यांच्या याचिकेवर सुनावणी पार पडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. सुनावणीवेळी करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांचं अंतिम इच्छापत्र आणि स्वीकृतपत्र सादर केलं होतं. तसेच आपल्याला धनंजय मुंडे यांच्यापासून दोन मुलं असल्याचा युक्तिवाद करुणा शर्मा यांच्याकडून करण्यात आला होता. तर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी करुणा शर्मा यांनी सादर केलेली कागदपत्रे खोटी असल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

करुणा शर्मा यांच्यापासून आपल्याला दोन मुलं असल्याचं धनंजय मुंडे यांनी न्यायालयात मान्य केलं. पण आमचं लग्न झालं नव्हतं, असा युक्तिवाद धनंजय मुंडे यांच्याकडून करण्यात आला. तर करुणा शर्मा यांनी आपण धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आहोत. कुटुंबाच्या दबावामुळे धनंजय मुंडे यांनी दुसरं लग्न केलं होतं, असा दावा करुणा शर्मा यांनी कोर्टात केला होता. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर वांद्रे कुटुंब न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. यावेळी न्यायालयाने काही निरीक्षण नोंदवले आहेत.

# नांदूरला शनिवारी सप्तश्रृंगी देवी यात्रोत्सव

**खंडाळा (वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील नांदूर येथे शनिवारी सालाबादप्रमाणे श्री सप्तशृंगी माता यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.

नांदूर येथील सप्तशृंगी माता मंदिराच्या स्थापने पासून येथे ग्रामस्थांच्या व भाविकांच्या मदतीने यात्रोत्सव सुरू झाला आहे. यात्रेचे २२ वे वर्ष असून प्रत्येक वर्षी चैत्र पौर्णिमेच्या दिनी या यात्रेचे आयोजन करण्यात येते.एक दिवसीय असलेल्या या यात्रेमध्ये सकाळपासून अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने सकाळी ७ ते ८ गंगाजल मिरवणूक, ८ ते ९ अभिषेक, १० ते १२ लहानू महाराज बगडीकर यांचे कीर्तन, १२ ते २ महाप्रसाद, सायंकाळी ६ वाजता सामुदायिक आरती, रात्री ७ ते ८ शोभेच्या दारूची आतषबाजी, रात्री ९ ते पहाटे २ पर्यंत जयमल्हार पार्टी यांचा जागरण गोंधळ असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. या धार्मिक सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जय बजरंग भजनी मंडळ, स्वामी समर्थ सेवेकरी, साई सेवक मित्र मंडळ, ओम गुरुदेव मित्र मंडळ, जनसेवा मित्र मंडळ, राजमुद्रा ग्रुप व समस्त ग्रामस्थ यांच्यावतीने करण्यात आले आहे.



**नवकार महामंत्र दिनाच्या निमित्ताने श्रीरामपूर येथील जैन स्थानकात मुनींच्या उपस्थितीत समाजबांधवांनी नवकार महामंत्र जप केला. आज महावीर जयंतीनिमित्ताने मिरवणूक निघणार असून महाप्रसादाचा कार्यकम कर्नावट कुटुंबाच्यावतीने आयोजित करण्यात आला आहे.**

# रामपूरवाडी येथे हरिनाम सप्ताह

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** रामपूरवाडी येथे दत्त महाराज, कालभैरवनाथ, मारुतीराया यांच्या कृपेने रामनवमी निमित्त यात्रोत्सव २०२५ तसेच अखंड हरिनाम सप्ताहाबरोबर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच संदीप सुरडकर यांनी दिली.

रविवार दि.६ रोजी सकाळी ७ वाजता मंदिरातील मूर्ती अभिषेक करण्यात आला. दुपारी ४ वाजता गावातील डफाचा कार्यक्रम झाला. सकाळी १० ते १२ वाजता रामपूरवाडी भजनी मंडळाचा भजनचा कार्यक्रम पार पडला. संध्याकाळी ६ वाजता पुणतांबा येथील जाधवराय महाराज यांची सवारी, रात्री ८ वाजता फटाक्यांची आतषबाजी, सोमवारी घोडा बैल शर्यत तसेच बुधवारी नामवंत तमाशा मास्टर नाना सोनवणे सह कल्पना सोनवणे लोकनाट्य तमाशा मंडळ यांचा कार्यक्रम होणार आहे. शनिवारी हनुमान जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्ताने या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी सरला बेटाचे मठाधिपती रामगिरीजी महाराज यांचे कीर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रामपूरवाडी ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

# कुस्तीच्या हगाम्याने जळगाव यात्रेची उत्साहात सांगता

**चितळी (वार्ताहर)–** श्रीरामनवमीच्या निमित्ताने राहाता तालुक्यातील जळगाव येथील जागृत देवस्थान रोकडोबा महाराज व मासूम बाबा यात्रा उत्सवाची रविवारी भव्य कुस्तीच्या हगाम्याने सांगता झाली. यावेळी विविध जिल्ह्यांसह राज्यातील नामवंत मल्लांनी जंगी कुस्त्याच्या हगाम्यात सहभाग नोंदवला.

स्व.नाथाजी लक्ष्मण चौधरी यांच्या स्मरणार्थ मानाची कुस्ती आयोजित करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील दीपक सरोदे व चितळी किरण आरणे यांच्यातली दंगल कुस्तीप्रेमीसाठी आकर्षण ठरले. दीपक सरोदे व किरण आरणे दोन्ही मल्लांच्या कुस्तीचा सामना बरोबरीची झाला. दोन्हीही कुस्तीपटूंना समान न्याय मिळण्यासाठी पंच व ज्येष्ठांच्या निर्णयानुसार बक्षिसाची विभागणी करण्यात आली. गणेशचे संचालक संपतराव चौधरी यांच्याहस्ते त्यांना मानाच्या कुस्तीच्या बक्षिसाचे वितरण करण्यात आले. कुस्तीचे पंच म्हणून शंकर चौधरी, गोपीनाथ चौधरी, रमेश चौधरी, किसन चौधरी यांनी काम पाहिले.

यात्रेची सुरुवात शनिवारी झाली.



शनिवारी रात्री भव्य आखाडीचा कार्यक्रम पार पडला. यात स्थानिक कलाकारांनी आपल्या कलेचा अविष्कार दाखवत भाविकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्यावतीने मासुमबाबा या देवताला मानाची चादर अर्पण करण्यात आली. रविवारी १० ते १ या वेळे राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती. दुपारी ५ ते ८ कुस्त्यांचा जंगी हगामा पार पडला. मंगळवारी गावातीलच स्थानिक कलाकार किरण वैराळ निर्मित स्वरमाधुर्य ऑर्केस्ट्रा उत्साहात पार पडला.

यावेळी श्रीरामपूर पोलीस ठाण्याचे प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक रॉबिन बंसल पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोहेकॉ रामेश्वर ढोकणे यांच्यासह इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला. याप्रसंगी किसान संघाचे जिल्हाध्यक्ष गंगाधर चौधरी गणेशचे संचालक संपतराव चौधरी, ॲड. अशोक वाघ, अण्णासाहेब चौधरी, यात्रोत्सव कमिटी अध्यक्ष दिलीप चौधरी, उपाध्यक्ष महेंद्र चौधरी, खजिनदार विजय चौधरी, पंडित चौधरी, विजय चौधरी, बाळासाहेब चौधरी, किरण चौधरी, रवींद्र चौधरी, बाबासाहेब चौधरी, भागवत वाघ, प्रवीण चौधरी, गोरख चौधरी, संजय चौधरी, अण्णासाहेब चौधरी, सुधाकर चौधरी, बापूसाहेब चौधरी, योगेश पंडित, पंचक्रोशीतील भाविकांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# महांकाळवाडगाव ते उंदिरगाव रस्ता दुरुस्तीची मागणी

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील महांकाळवाडगाव ते उंदीरगाव रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झाली असून या रस्त्याची लवकरात लवकर दुरूस्ती करण्यात यावी, अशी मागणी वसंतराव पवार व रामराव औताडे यांनी केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महांकाळवाडगाव ते उंदीरगाव या रस्त्यावरून २४ तास वाहतूक सुरू असते. तसेच महांकाळवाडगाव हे गोदावरी नदीकाठी असल्याने या गावाजवळील आजूबाजूचे ९ ते १० गावाचे नागरिक ,शालेय विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थ याचा मार्गाने प्रवास करतात. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झाल्याने या रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरी लवकरात लवकर या रस्त्याची दुरूस्ती करण्यात यावी असे पत्रकात म्हटले आहे.

## पान १ वरुन

### तहव्वूर राणाला आज भारतात आणणार

पथकात उपमहानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचं सांगितलं जात आहे.

दरम्यान, तहव्वुर राणाला भारतात आणलं जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत. देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह आदी महत्वाच्या अधिकाऱ्यांबरोबर उच्चस्तरीय बैठक बोलवली आहे. तहव्वुर राणाला अमेरिकेतून विमानाने दिल्लीत आणलं जाण्याची शक्यता आहे.

### पंतप्रधान मोदींनी केला नवकार महामंत्राचा जप

रूपात आहेत आणि आपल्या मार्गाच्या आत ही बाहेर पडते. त्यांनी नवकार मंत्राची शिकवण दिली आहे. ते म्हणाले की वास्तविक शत्रु स्वयं के अंतर्गत आहे त्यामुळे नकारात्मक विचार, अविश्वास, शत्रुता आणि स्वार्थ इन सर्व विजय प्राप्त करणे ही वास्तविक विजय आहे. त्यांनी रेखांकित केले आहे की जैन धर्म व्यक्तीला बाहेरची दुनिया स्वतःवर विजय प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन करते. ते म्हणाले की आत्म-विजय व्यक्तीला अरिहंत बनवती आहे. ते म्हणाले की नवकार मंत्र एक मार्ग आहे जो व्यक्ती त्याच्या आत शुद्ध करता.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, 'मी नवकार महामंत्राच्या या आध्यात्मिक शक्तीचा अजूनही माझ्या आत अनुभव घेत आहे. काही वर्षांपूर्वी मी बंगळूरमध्ये अशाच एका सामूहिक मंत्रोच्चाराचा साक्षीदार झालो होतो, आज तीच अनुभूती झाली आणि तितक्याच खोलीत झाली.

पंतप्रधान म्हणाले, नवकार महामंत्र या ज्ञानाचा स्रोत बनू शकतो, नवीन पिढीसाठी हे मंत्र जप नाही, दिशा आहे. हे आयोजन एकतेचा संदेश बनले आहे, जो कोणी भारत माता की जय म्हणतो, त्याला आपण सोबत घेऊन जायचे आहे. शेवटी आपले भाषण संपवताना ते म्हणाले, मी जैन समाज, मुनी-महाराजांनाही नमन करतो. ते म्हणाले की, नवकार महामंत्र एक मार्ग आहे. असा मार्ग जो माणसाला आतून शुद्ध करतो, जो माणसाला सौहार्दाचा मार्ग दाखवतो.

### अमेरिका-चीन यांच्यात व्यापार भडका

दिला होता, अन्यथा अधिक कठोर कारवाई केली जाईल. चीनने नकार दिल्यानंतर, वॉशिंग्टनने चिनी आयातीवर विक्रमी १०४ टक्के कर लादण्याची घोषणा केली.

बुधवारीच, बीजिंगने अमेरिकेची मागणी नाकारली आणि ती जबरदस्तीचे धोरण असल्याचे म्हटले. चीनविरुद्ध शुल्क वाढवण्याची अमेरिकेची धमकी ही एकामागून एक चूक आहे, जी पुन्हा एकदा अमेरिकेची ब्लॅकमेल करण्याची प्रवृत्ती अधोरेखित करते, असे चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. मंत्रालयाने पुढे इशारा दिला की, जर अमेरिका आपल्या हट्टीपणावर कायम राहिली तर चीन शेवटपर्यंत लढेल.

फेब्रुवारीमध्ये अमेरिकेने चीनवर १० टक्के कर लादला. प्रत्युत्तरादाखल, चीनने अमेरिकेच्या कोळसा आणि द्रवीभूत नैसर्गिक वायूवर १५ टक्के आणि कच्चे तेल, कृषी यंत्रसामग्री आणि मोठ्या गाड्यांवर १० टक्के शुल्क लादले.

यामुळे ट्रम्प संतापले आणि त्यांनी आरोप केला की चीनच्या उच्च शुल्कामुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेतून अब्जावधी डॉलर्स बाहेर गेले. त्यानंतर अमेरिकेने साखर आयातीवर आणखी १० टक्के शुल्क वाढवले आणि त्यामुळे साखर आयातीवरील एकूण शुल्क २० टक्क्यांवर पोहोचले. प्रत्युत्तरादाखल, चीनने अमेरिकेतील चिकन, गहू, कॉर्न आणि कापसावर १५ टक्के आणि ज्वारी, सोयाबीन, डुकराचे मांस, गोमांस, जलचर उत्पादने, फळे, भाज्या आणि दुग्धजन्य पदार्थांवर १० टक्के कर लादला.

**चिनी वस्तूंवरील अमेरिकेचा कर १०४% पर्यंत कसा पोहोचला?**

यानंतर, ट्रम्प यांनी रेसिप्रोकल टॅरिफ धोरण लागू केले, ज्या अंतर्गत अमेरिका कोणत्याही देशाने त्याच्या निर्यातीवर लावलेल्या आयातीवर अर्धा शुल्क लावेल. या धोरणांतर्गत, साखर आयातीवर अतिरिक्त ३४% शुल्क लादण्यात आले, ज्यामुळे एकूण दर ५४% झाला. आता नवीन ५० टक्के अतिरिक्त शुल्कासह, चीनवर लादलेले एकूण शुल्क १०४ टक्क्यांवर पोहोचले आहे, जे एका आठवड्यात जवळजवळ दुप्पट झाले आहे.

तथापि, या तणावाच्या पार्श्वभूमीवर, ट्रम्प यांनी आपण चर्चेसाठी तयार असल्याचे संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी शुल्क वाढ जाहीर केल्यापासून चीन देखील अमेरिकेशी व्यापार चर्चा करण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु अद्याप दोन्ही देशांमध्ये कोणत्याही चर्चेची पुष्टी झालेली नाही.

### 'कोंबडी चोर' बिबट्या पोल्ट्रीत जेरबंद!

परंतु अंधारात बाहेर पडण्याचा मार्ग सापडेना. त्यामुळे बिबट्या पोल्ट्री फार्ममध्ये रस्ता शोधायला फिरू लागला. बिबट्याला पाहिल्यावर कोंबड्या आरडाओरड लागल्या. त्यामुळे शेतकरी वाबळे यांना बिबट्या अडकल्याचे लक्षात आले.

घटनेची माहिती समजताच वनक्षेत्रपाल युवराज पाचारणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल लक्ष्मीकांत शेंडगे, वनरक्षक समाधान चव्हाण, शंकर खेमनर, मदन गाडेकर, राजेंद्र घुगे, वन कर्मचारी सुभाष घनदाट, बाळासाहेब झावरे, मुसाखान पठाण, बाळासाहेब दिवे यांनी पिंजऱ्यासह घटनास्थळी धाव घेतली. बिबट्या चिडलेला होता. त्यामुळे बेशुद्ध केल्याशिवाय त्याला जेरबंद करणे शक्य नव्हते.

संगमनेर येथील वनरक्षक संतोष पारधी, वन कर्मचारी रवींद्र पडवळे यांना बोलविण्यात आले. त्यांनी भुलीचे डॉट मारून बिबट्याला बेशुद्ध केले. सकाळी साडेअकरा वाजता बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी बिबट्याची जागेवर तपासणी केली. मादी बिबट्या असल्याने वन खात्याने घटनास्थळापासून दोन किलोमीटर अंतरावरील वन खात्याच्या वाबळेवाडीच्या जंगलात नैसर्गिक अधिवासात बिबट्याला मुक्त केले.

### फळपीक विमा योजनेसाठी ई-पीक पाहणी सक्तीची

वतीने भारतीय कृषी विमा कंपनी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी, फ्युचर जनरल इन्शुरन्स कंपनी आणि युनिव्हर्सल जनरल इन्शुरन्स कंपनीयांना सहभागी करून घेण्यात आले आहे. या कंपनीमार्फत फळपीक विमा योजना यामध्ये संत्रा, मोसंबी, डाळिंब, द्राक्ष, चिकू, पेरू, सिताफळ व लिंबू या आठ फळ पिकांसाठी २६ जिल्ह्यांमध्ये मृग बहार तर २०२४- २५ मध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, काजू, केळी, द्राक्षे, आंबा व पपई स्ट्रॉबेरी या ९ फळ पिकांसाठी ही हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांना पीक पाणी सक्तीची करण्यात आली असून त्यांनी येत्या २५ एप्रिलपर्यंत डिजिटल क्रॉप सर्वे या ॲपवर नोंदणी केलेली नसल्यास त्यांना विमा योजनेचा लाभ मिळणार नसण्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आली. यामुळे या योजनेत अर्ज केलेल्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाणी करून घ्यावी असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

**असे आहेत तालुकानिहाय अर्ज**

अकोले ५, जामखेड १६, कोपरगाव १२, नगर ८४, नेवासा १४३, पारनेर १२२, पाथर्डी ७४३, राहाता ४९, राहुरी ३३, संगमनेर ९१, शेवगाव ११३, श्रीरामपूर ३८ अशा २ हजार ३३१ शेतकऱ्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात मृत बहार फळपिक योजनेत दरवर्षी सरासरी १३ हजार शेतकरी सहभागी होतात. आंबिया बहारमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण जिल्ह्यात कमी आहे.

### सुप्रिया सुळेंचा रस्त्यासाठी ठिय्या

लाडक्या बहिणीच्या मतदार संघात भावाचे लक्ष नाही का त्या प्रश्नावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, ते मला माहिती नाही आणि मी या ठिकाणी केवळ बनेश्वर येथील रस्त्याचा प्रश्न सुटला जावा,या मागणीसाठी उपोषणास बसले असल्याचे त्यांनी सांगितले.

### सवलतीच्या क्रीडा गुणांसाठी दोन स्वतंत्र शुल्काचा आर्थिक भार

यंदा या प्रक्रियेत बदल करून ही प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली. शाळा, महाविद्यालयांनी आपले सरकार संकेतस्थळावर प्रत्येक खेळाडूची स्वतंत्रपणे नोंदणी करणे, त्यासाठीची आवश्यक कागदपत्रे प्राचार्य, मुख्याध्यापक, खेळाडूने स्वसाक्षांकित करून संकेतस्थळावर सादर करण्याच्या सूचना क्रीडा विभागाने दिल्या. ऑनलाइन प्रक्रियेव्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, ऑनलाइन अर्जांवर शिफारस करून ते राज्य मंडळाला पाठवले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या अर्जासाठी आपले सरकार संकेतस्थळाकडून २३ रुपये ६० पैसे शुल्क आकारण्यात आले आहे. आता राज्य मंडळाचे २५ रुपये शुल्क भरण्याचे निर्देश शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.

### मयत वाघमारे यांचा मृतदेह शिर्डी पोलीस ठाण्यात आणून नातेवाईकांचे आंदोलन

पार्थिवासह शिर्डी पोलीस ठाणे गाठले. हे भिक्षेकरी नसतांना त्यांना पोलीस, नगरपालिका व साईसंस्थानने पकडले. कोर्टाने त्यांना तिकडे विसापूरला पाठवले. तिथे त्यांना बांधून ठेवण्यात आले, अन्न पाणीही देण्यात आले नाही. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला असा आरोप करत याला संबधित यंत्रणा जबाबदार आहेत, याप्रकरणी फिर्याद दाखल करा अशी नातेवाईकांची मागणी केली. आमचा बाप जिवंत नेला, जिवंत आम्हाला परत द्या अशी आर्त भावना वाघमारे यांच्या मुलगा, मुली व नातेवाईकांनी व्यक्त केली. नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात हंबरडा फोडला. त्यांच्या बरोबर बौद्ध भिक्खु पण ठाण्यात आले होते. पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने यांनी यासंदर्भात पंचनामा व शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कारवाई करण्याचे फिर्याद दाखल करून कारवाईचे आश्वासन दिले. यावेळी पोलीस निरीक्षक रणजित गलांडे उपस्थित होते.

रिपाइंची जिल्हाध्यक्ष प्रदीप बनसोडे, नाशिकचे अँड राहुल तूपलोंढे आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी यावेळी नातेवाईकांच्या भावना तीव्रतेने व्यक्त केल्या. शिर्डी पोलीस ठाण्यात बुधवारी मयत शेख व वाघमारे यांच्या नातेवाईकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली त्यावेळी पोलीस ठाण्यात समोर काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे बघायला मिळाले.

### तहव्वूर राणाला आज भारतात आणणार

गृहातील अत्यावस्थ दहाजणांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार घेत असलेल्या भिक्षेकरूंपैकी अशोक बोरसे, सारंधर वाघमारे, प्रवीण घोरपडे आणि इस्सार शेख (वय ३८) यांचा मृत्यू झाला. यातील एकाचा मृत्यू सोमवार, ७ एप्रिल रोजी झाला असून उर्वरित तिघांनी मंगळवार, ८ एप्रिल रोजी प्राण सोडले. सर्व मृतदेहांचे शवविच्छेदन बुधवारी करण्यात आले. या शवविच्छेदनानंतर मृतांच्या शरिरातील नमुने रासायनिक विश्लेषणासाठी काढण्यात आले आहेत. त्याची शासकीय प्रयोग शाळेत तपासणी करण्यात येणार असून त्या आधारे संबंधीतांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट करण्यात येणार आहे.

दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चव्हाण यांनी चार सदस्यीय चौकशी समिती गठित केली आहे. समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत पाठक यांची नियुक्ती करण्यात आली असून, सदस्य म्हणून डॉ. शिवशंकर वलांडे, डॉ. दर्शना धोंडे-बारवकर आणि कनिष्ठ लिपिक दत्तात्रय धाडगे हे घडलेल्या प्रकाराची चौकशी करत आहेत. या समितीचा अहवाल पुढील आठवड्यात सोमवारी हाती येण्याची शक्यता असल्याचे डॉ. चव्हाण यांनी सांगितले.

**भिक्षेकऱ्यांचा मृत्यू ही हत्याच- खा. लंके**

जिल्हा रुग्णालयात झालेला चार भिक्षेकऱ्यांचा मृत्यू हा मृत्यू नसून हत्या आहे, असा आरोप नगर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे खा. निलेश लंके यांनी केला आहे. एका युवा नेत्याच्या हट्टापायी ४ भिक्षुकांचा बळी गेला, असा दावा करताना माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्यावर त्यांनी निशाणा साधला. जिल्हा रुग्णालयात चार भिक्षेकर्यांच्या मृत्यूची घटना समजल्यावर खा. लंके यांनी मंगळवारी रात्री उपचार घेत असलेल्या भिक्षुकांची जिल्हा रुग्णालयात भेट घेत त्यांच्या तब्बेतीची विचारपूस केली. त्याचबरोबर प्रशासनाच्या भोंगळ कारभारावर प्रश्न उपस्थित केले. यावेळी खा. लंके म्हणाले, शिर्डी येथे भिक्षा मागून जगणाऱ्या ५० भिक्षुकांना शिर्डी पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांना विसापूर कारागृहात पाठवले. त्यातील १० भिक्षुकांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले होते. २ दिवसात त्यातील ४ भिक्षुकांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, पण हे मृत्यू नसून हत्या आहे, असा आरोप करून खा. लंके म्हणाले, या १० भिक्षुकांपैकी ३ जण रुग्णालयातून पळून गेले. यावेळी पोलिस आणि रुग्णालय प्रशासन काय करत होते? १० भिक्षुकांना रुग्णालयात आणले गेले तेव्हा त्यांना रुग्णालयातील कारागृहात डांबून ठेवण्यात आले होते का ? असा प्रश्न देखील खा. लंके यांनी उपस्थित केला. एका युवा नेत्याच्या मागणीमुळे कधी नव्हे ती भिक्षुकांवर कारवाई करून त्यांना कारागृहात डांबण्यात आले, ही प्रशासनाची चूक आहे. याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल यावेळी त्यांनी उपस्थित केला.